


दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ३७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२० सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मातोश्रीच्या उंबरठ्यावर अब्रुनुकसानीची नोटीस, सतीश सालियन यांचे धमकीचे आरोप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे पुत्र तथा वरळीचे आमदार आदित्य ठाकरे यांना दिशा सालियन हिच्या वडिलांनी तब्बल ५०० कोटी रुपयांच्या अब्रुनुकसानीची नोटीस बजावली आहे. सतीश सालियन यांनी उद्धव ठाकरे यांच्या मुंबईच्या कलानगर येथील 'मातोश्री' निवासस्थानाच्या गेटवर जात आदित्य ठाकरे यांना नोटीस दिली. आदित्य ठाकरे यांच्या वकिलांनी मातोश्रीच्या गेटवरुन ही नोटीस स्वीकारली. दिशा सालियन ही दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची माजी मॅनेजर होती. तिच्या मृत्यू प्रकरणावरुन आदित्य ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते नारायण राणे यांनी या प्रकरणी आरोप केले होते.

आदित्य ठाकरे यांनी नुकतंच या प्रकरणी होत असलेल्या आरोपांवर आपली भूमिका मांडली होती. आपण दिशाला ओळखतही नसून तिच्यासोबत आपली कधीच भेट झाली नाही. चारित्र्यहनन करण्याच्या हेतून अशाप्रकारचे आरोप आपल्यावर केले जात असल्याचं स्पष्टीकरण आदित्य ठाकरे यांनी दिलं होतं. तसेच उद्धव ठाकरे यांनीदेखील या आरोपांचं खंडन केलं होतं. ठाकरे पिता-पुत्रांनी भूमिका मांडल्यानंतर आज दिशाच्या वडिलांनी थेट 'माताश्री'च्या दारी जात अब्रुनुकसानीची नोटीस बजावली आहे.

**'मातोश्री'च्या गेटवर सालियन आणि शिवसैनिक आमनेसामने**

सतीश सालियन आणि त्यांचे वकील निलेश ओझा मातोश्री बंगल्याच्या गेटवर गेले. यावेळी तिथे काही गोंधळ उडालेला बघायला मिळाला. सतीश सालियन येण्यापूर्वीच माताश्री बंगल्याबाहेर शिवसैनिकांनी गर्दी केली होती. त्यांनी सतीश सालियन आणि त्यांच्या वकिलांना विरोध केला. तसेच माध्यमकर्मीचीदेखील या परिसरात मोठी गर्दी बघायला मिळाली. यामुळे मातोश्रीच्या गेटबाहेर मोठी गर्दी जमा झालेली बघायला मिळाली. या सर्व गर्दी आणि गोंधळाच्या परिस्थितीत सतीश सालियन यांच्या वकिलांनी आदित्य ठाकरे यांच्या वकिलांना नोटीस दिली. यावेळी आदित्य ठाकरे यांच्या वकिलांनी स्वाक्षरी करत ती नोटीस स्वीकारली. तसेच आपण ही नोटीस स्वीकारली असून वाचलेली नाही, असं आदित्य ठाकरे यांचे वकील माध्यमांना म्हणतात.



**वकील निलेश ओझा काय म्हणाले?**

नोटीसमध्ये आदित्य ठाकरे यांना माफी मागावे, असे सांगण्यात आले आहे. तसेच माफी न मागितल्यास ५०० कोटींची भरपाई द्या. हे संविधान माझ्या हातात आहे. सर्वसामान्य व्यक्ती कुणापेक्षा कमी नाही. संविधानत सर्व एकसमान आहेत हे सांगण्यासाठी मी संविधान दाखवत आहे, असं वकील निलेश ओझा म्हणाले.

**दिशाचे वडील काय म्हणाले?**

यावेळी पत्रकारांनी दिशाच्या वडिलांना पत्राद्वारे नोटीस देऊ शकले असते, मातोशीच्या दारावर येऊन नोटीस का दिली? असा प्रश्न विचारला. त्यावर सतीश सालियन यांनी प्रतिक्रिया दिली. मला दाखवायचं होतं, तुम्ही माझ्या वकिलांना धमकी देतात. आदित्य ठाकरेंच्या माणसांनी माझ्या वकिलांना धमकी दिली होती की, तुम्ही लोकं कोर्टात येऊ शकत नाहीत, असं सतीश सालियन म्हणाले.

**नोटीसमध्ये काय म्हटलंय?**

संबंधित नोटीसमध्ये आदित्य ठाकरे यांना सात दिवसांत माफी मागण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. माफी न मागितल्यास ५०० कोटींची भरपाई द्यावी, असं नोटीसमध्ये म्हटल्याचं वृत्त काही माध्यमांनी दिलं आहे. आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियावर या प्रकरणावर आपली भूमिका मांडली. त्यावर सतीश सालियन यांनी आक्षेप घेतला आहे. त्यावरुनच त्यांनी आदित्य ठाकरे यांना नोटीस बजावली आहे.

---

# गणेशोत्सवातही फूल उत्पादकांची निराशा ! झेंडूच्या दरात घसरण; शेतकरी हवालदिल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, अहिल्यानगर :** गणेशोत्सवाच्या धामधुमीत फुलांना मोठी मागणी असणे अपेक्षित असताना, यंदा मात्र बाजारपेठेत झेंडूच्या फुलांचे भाव कमालीचे कोसळले आहेत. प्रति किलो अवघ्या ५ ते १० रुपये दर मिळत असल्याने झेंडू उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. बाजारभावातून लागवडीचा आणि तोडणीचा खर्चही निघत नसल्याने वैतागलेल्या अनेक शेतकऱ्यांवर काढलेली फुले रस्त्यावर फेकून देण्याची किंवा उभी पिके सोडून देण्याची दुर्दैवी वेळ आली आहे.

झेंडूच्या पिकासाठी एकरी सुमारे ४० हजार रुपयांचा खर्च येतो. यामध्ये बेणे, लागवड, खते, औषध फवारणी, पाणी व्यवस्थापन, तोडणीची मजुरी आणि वाहतुकीचा मोठा समावेश असतो. एवढा अफाट खर्च करूनही बाजारात फुलांना कवडीमोलाचा दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. फुले तोडून बाजारात नेण्याचा वाहतूक खर्चही अंगावर पडत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी पिकाकडे पाठ फिरवली आहे.

**प्लास्टिकच्या फुलांवर बंदीची मागणी...**

गणेशोत्सव व नवरात्रौत्सवात बाजारात प्लास्टिक व कृत्रिम फुलांचा वापर वाढत असल्याने त्याचा परिणाम नैसर्गिक फुलांच्या मागणीवर होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. शासनाने प्लास्टिकच्या फुलांवर बंदी घालावी, अशी मागणी होत आहे.



लागवडीचा आणि मेहनतीचा मोबदला दूरच, पण हातात काहीच उरत नसल्यामुळे बळीराजा चिंतेत आहे. प्रशासनाने आणि व्यापाऱ्यांनी या परिस्थितीची दखल घेऊन फुलांना योग्य व परवडणारा बाजारभाव मिळवून द्यावा, अशी मागणी झेंडू उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

---

# संशयाचे रूपांतर हत्येत;
# गव्हाण फाट्यात पत्नीची हत्या, पती-मित्र गजाआड

**अक्षराज : अभिनव येलवे**



**दि.१९, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल गव्हाण फाटा परिसरात पत्नीची हत्या करून तिचा मृतदेह अर्धवट खड्ड्यात टाकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी महिलेचा पती सुशील हिरेन आणि त्याचा मित्र रमेश तमस एक्का या दोघांना अटक केली आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत पतीने मित्राच्या मदतीने तिच्यावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून हत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

गव्हाण फाटा येथील वाहतूक पोलिस चौकीजवळ एका महिलेची हत्या करून तिचा मृतदेह खड्ड्यात टाकण्यात आल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पाहणी केल्यानंतर खड्ड्यात अर्धवट टाकलेला महिलेचा मृतदेह बाहेर काढून ताब्यात घेतला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, घटनेचा तपास सुरू करण्यात आला.

पोलिस तपासादरम्यान मृत महिलेची ओळख बिबीयाना अशी पटली. तपासाची चक्रे फिरवल्यानंतर तिचा पती सुशील हिरेन याच्यावर पोलिसांचा संशय बळावला. सुशील हिरेन हा गव्हाण फाटा येथील वाहतूक कार्यालयासमोरील पुलाखाली राहत असून, तो भंगार गोळा करण्याचे काम करतो. तो मूळचा झारखंड येथील असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, सुशील हिरेन याने त्याचा मित्र रमेश तमस एक्का याच्या मदतीने पत्नी बिबीयाना हिच्यावर तिच्या चारित्र्यावर संशय घेत मारहाण केली. या मारहाणीत तिचा मृत्यू झाल्यानंतर दोघांनी तिचा मृतदेह गव्हाण फाटा वाहतूक पोलिस चौकीजवळील खड्ड्यात अर्धवट टाकल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले.

घटनेनंतर पोलिसांनी संशयितांचा शोध घेत दोघांना ताब्यात घेतले आणि त्यांना अटक केली. या प्रकरणामागील नेमके कारण, हत्येची वेळ आणि घटनाक्रम तसेच मृतदेहाची विल्हेवाट लावण्यामागील परिस्थिती याबाबत पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे. या घटनेमुळे गव्हाण फाटा परिसरात खळबळ उडाली असून, पनवेल शहर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

---

# दगडी चाळ गँगवार प्रकरणातील मकोकाचा आरोपी मेडिकल रुग्णालयातून पसार

## शहर गुन्हे शाखेसह पोलिसांची पथके अलर्ट मोडवर

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** मुख्य बाजारपेठ खापरखेडा येथील बहुचर्चित दगडी चाळ गँगवार प्रकरणातील मकोकाचा कुख्यात आरोपी शेख समीर उर्फ बोमट्या वल्द रहीम शेख रा. कामठी याने १९ सप्टेंबर शनिवारला सकाळी नागपुरातील शासकीय मेडिकल रुग्णालयातून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला त्यामूळे शहर पोलीस यंत्रणेत प्रचंड खळबळ उडाली आहे आरोपीच्या शोधात शहर गुन्हे शाखेसह स्थानिक पोलिसांची पथके वेगवेगळ्या दिशेने रवाना झाली आहेत.

खापरखेडा मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्ट रोजी दगडी चाळ गँगवार प्रकरण घडले होते सदर गुन्ह्याची दखल घेत पोलिसांनी दगडी चाळ टोळीचा मुख्य सूत्रधार सूरज कावळे, संघर्ष बागडे, शुभम उर्फ शेरू उईके, साहिल उर्फ बुट्या बागडे, मोहन रोशनसिंग खुरावत, युगांत राजेश सारखे, प्रियांशु विद्याधर रक्षित, हेमंत उर्फ सुदामा मधुकर चाफाडाहाके, जितू रामचंद्र कनोजिया, शांतनु उर्फ दद्दु उर्फ राजेंद्र बागडे, चेतन सतीश पाटमासे, हर्ष उर्फ आकाश राजेश वर्मा, शेख समीर उर्फ बोमट्या वल्द रहीम शेख यांच्यासह तीन अल्पवयीन गुन्हेगार व इतर साथीदारांविरुद्ध विविध कलमांव्ये गुन्हा दाखल करून महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) अंतर्गत कठोर कारवाई केली होती यातील ९ आरोपी तुरुंगात आहेत तर इतर अल्पवयीन आरोपींना बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे.



आरोपी शेख समीर उर्फ बोमट्या वल्द रहीम शेख तुरुंगात असतांना त्याची प्रकृती बिघडली त्यामूळे १७ सप्टेंबर गुरुवारला उपचारासाठी नागपुरातील शासकीय मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते त्याच्यावर चोवीस तास पाळत ठेवण्यासाठी पोलीस मुख्यालयातून विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला होता मात्र यादरम्यान १९ सप्टेंबर शनिवारला सकाळी सुमारे १० ते १०.१५ वाजताच्या सुमारास पोलिसांची नजर चुकवून आरोपी शेख समीर उर्फ बोंमट्या वल्द रहीम शेख पसार झाला.

पोलीस तैनात असताना मकोकाचा आरोपी पळून गेल्याचे लक्षात येताच पोलीस कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले

घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच पोलीस प्रशासनात मोठी खळबळ उडाली यासंदर्भात अजनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आला. शहर गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांच्या पथकांनी नागपूर शहरासह कामठी आणि कन्हान परिसराची कसून नाकाबंदी करून आरोपीचा शोध घेतला मात्र अद्याप आरोपीचा कोणताही सुगावा लागलेला नाही.

कडक बंदोबस्त असताना मकोकाचा आरोपी सहज पळून गेल्या मूळे पोलिसांच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

---

# मुखेड तालुक्यात दुष्काळ जाहीर करा : कृषीमंत्र्यांकडे मागणी

**अक्षराज : अशोक लोणीकर**



**दि.१९, मुखेड (नांदेड) :** नांदेड जिल्हा दौऱ्यावर आलेल्या राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन मा.जि.प.अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर यांनी मुखेड-कंधार तालुक्यामध्ये तात्काळ दुष्काळ जाहीर करा अशा प्रकारचे निवेदन देऊन मागणी केली आहे. मुखेड -कधार दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीचे निवेदन नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण व नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांना देण्यात आले,यावेळी शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर उपस्थित होते.

पावसाने दीड महिन्यापेक्षा अधिकचा काळ दडी मारल्यामुळे हाताशी व तोंडाशी आलेली पीकं आज वाळायला लागली असल्यामुळे शेतकरी आज प्रचंड अडचणीत सापडला असुन तो माणसिकदृष्या व अर्थिकदृष्ट्या पुर्णपणे खचलेला आहे. म्हणून दुष्काळ यादीमध्ये मुखेड-कंधार तालुके समाविष्ट करा अशी शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत चार दिवसापूर्वी उपजिल्हाधिकारी व मुखेड-कंधार तहसीलदार यांच्याकडे मागणी केली होती. तात्काळ दुष्काळ जाहीर केला नाही तर हजारो शेतकऱ्यांसह मुखेड तहसील कार्यालयावर मोर्चा काढू असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

---

# प्राचार्य बाळासाहेब खिलारी 'ज्ञानज्योती' पुरस्काराने सन्मानित

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठान संचलित शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, धोत्रे बु. यांच्यावतीने दिला जाणारा मानाचा 'ज्ञानज्योती पुरस्कार २०२६' श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नारायण खिलारी यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम पाटील खिलारी (अण्णा) यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. २८ वर्षांच्या प्रदीर्घ अध्यापन सेवेतून हिंदी विषयाच्या प्रचार-प्रसारासाठी तसेच गुणवत्तावाढ व संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.



याप्रसंगी स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. प्रशांत शिंदे, सचिव सोनाली शिंदे, प्राचार्य डॉ. जयदीप पवार, प्राचार्य आदम शेख, जिल्हा शिक्षक संघाचे सचिव अमोल ठाणगे, तालुकाध्यक्ष भगवान राऊत, ज्येष्ठ शिक्षक सहादू भोंडवे आदी उपस्थित होते.

प्राचार्य बाळासाहेब खिलारी हे १९९८ पासून मराठा विद्या प्रसारक समाजात कार्यरत असून त्यांनी १ जून २०२५ रोजी प्राचार्यपदाचा कार्यभार स्वीकारला आहे. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सर्व पदाधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## संपादकीय

# जर्मनीतील अतिउजवा पर्याय

जर्मनीतील कडव्या उजव्या विचारसरणीच्या अल्टरनेटिव्ह फॉर डॉईशलँड (एएफडी) या पक्षाने युरोपातील राजकारण ढवळले आहे. जर्मनीच्या १६ प्रांतांपैकी एक असलेल्या सेक्सोनी-ऑनाहाल्टच्या प्रांतीय संसदेसाठी झालेल्या निवडणुकीत २५ वर्षांपासून सत्तेवर असलेल्या ख्रिश्चियन डेमोक्रॅटिक पक्षाची (सीडीयू) मते निम्म्याहून कमी होत १७ टक्क्यांवर येणे आश्चर्यकारक नव्हते, परंतु एएफडीने सर्वाधिक ४३.८ टक्के मते/प्राप्त करणे धक्कादायक ठरले आहे. इतर युरोपीय देशांतील कडव्या उजव्या पक्षांच्या तुलनेत जर्मनीच्या एएफडीचे राजकीय यश युरोपीय राजकारणाला तीव्र उजवे वळण/ देणार अशी सबळ शक्यता आहे. एक तर/ जर्मनीत कडव्या विचारसरणीच्या पक्षांना सरकारमध्ये स्थान मिळू नये याबाबत मुख्य धारेतील राजकीय पक्षांमध्ये/ सहमती आहे./ विशेषतः,/एएफडी ची स्थापना झाल्यानंतर इतर सर्व पक्षांनी या पक्षाविरुद्ध राजकीय लक्ष्मणरेखा (फायरवॉल)/आखली होती./ जर्मनीत नाझी इतिहासाची पुनरावृत्ती होऊ नये, याकरता राज्यघटनेतसुद्धा/ कडक संरक्षणात्मक तरतुदी आहेत./ नव्या पिढीमध्ये कडवे वंशवादी विचार रुजणार नाहीत याकरता शक्य ती सर्व काळजी जर्मन शिक्षण व्यवस्थेत/ घेण्यात आली आहे. असे असूनही नवनाझीवादाचा आरोप असलेल्या एएफडीचा झंझावात थांबवणे अशक्यप्राय वाटते आहे.

प्रस्थापित राजकीय पक्षांच्या फायरवॉल धोरणाचा एएफडीला लाभच झाला आहे. इतर सर्व पक्ष एकम ेकांचे सगेसोयरे आणि अशा बलाढ्य सत्ताधीशांविरुद्ध एएफडीची/ एकाकी झुंज, असे राजकीय चित्र जर्मनीत उभे ठाकले आहे. खरे तर आजही एएफडीची राष्ट्रीय पातळीवरील लोकप्रियता २८ टक्के आहे आणि इतर सर्व पक्षांचा समर्थक वर्ग ७२ टक्के आहे. तरी सुद्धा ७२ टक्क्यांचे समर्थन असलेले सेंटर-राईट, सेंटर-लेफ्ट, ग्रीन व डावे पक्ष हे जर्मनविरोधी असल्याचा कांगावा करण्यात एएफडीला यश येते आहे. सीरियातील गृहयुद्धानंतर जर्मनीने स्वीकारलेले लाखो मुस्लिम स्थलांतरित आणि रशिया-युक्रेन युद्धानंतर जर्मनीत भडकलेल्या तेल व नैसर्गिक वायूंच्या किमती या दोन मुद्द्यांचे एएफडीने भांडवल केले आहे. जगातील सर्वात संपन्न देशांमध्ये पुढील स्थानावर असलेल्या जर्मन देशाची संस्कृती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे आणि अर्थकारण रसातळाला चालले आहे, याची मतदारांना खात्री पटवण्यात एएफडी यशस्वी ठरते आहे.

एएफडीच्या यशाच्या गंभीरतेचे दुसरे कारण म्हणजे या पक्षाची युरोपीय महासंघाविरोधातील भूमिका! जर्मनी हे युरोपीय महासंघाचे आर्थिक व राजकीय इंजिन आहे./ सन २०१३ मध्ये एफडीची स्थापनाच युरोपीय महासंघाच्या युरो चलनाच्या विरोधात झाली होती. युरोझोनचा सदस्य असलेल्या ग्रीसच्या खिळखिळ्या अर्थव्यवस्थेला उभारी आणण्याकरता जर्मनीच्या तत्कालीन चॅन्सेलर एंजेला मर्केल यांनी पुढाकार घेतला होता. त्या वेळी ग्रीसचे ओझे जर्मन करदात्यांच्या खांद्यावर का टाकायचे, असा सवाल करून नवउदारमतवादी श्रीमंत करदात्यांच्या पाठिंब्याने एएफडीची स्थापना झाली होती. एएफडीच्या या भूमिकेमुळे युरोपीय महासंघ लवकरच विस्कळित/ होतो की काय, अशी भीती निर्माण झाली आहे.

युरोपातील उदारमतवादी व डाव्या वर्गाने एएफडीचा धसका घेण्याचे तिसरे कारण म्हणजे या पक्षाने आपल्या १३ वर्षांच्या राजकीय प्रवासात आपली धोरणे अधिकाधिक कडवी केली आहेत./इतर युरोपीय देशातील उजव्या पक्षांनी लोकशाही प्रक्रियेत त्यांची धोरणे काही प्रमाणात/ मिळमिळीत करत आपला जनाधार वाढवला, मात्र एएफडीने जर्मन अस्मिता धोक्यात आल्याचा प्रचार सातत्याने करत देशातील मुस्लिम नागरिक, स्थलांतरित, समलिंगी (एएफडीच्या राष्ट्रीय सह-अध्यक्ष व चॅन्सेलरपदाच्या उमेदवार एलिस वाईडेल स्वतः समलिंगी आहेत), पर्यावरणवादी आणि युरोपीय महासंघाचे समर्थक यांच्याविरुद्ध प्रखर भूमिका घेण्यात कसर केली नाही. या भूमिकांमुळे एएफडीच्या समर्थनात वाढच झाली आहे. सन २०२४/च्या/युरोपीय संसदेच्या निवडणुकीत या पक्षाला १५ टक्के मते मिळाली होती,/तर सन २०२५च्या राष्ट्रीय संसदेच्या निवडणुकीत २१ टक्के मतांसह एएफडी/दुसऱ्या स्थानावर होती./ ही आकडेवारी स्पष्ट दर्शवते की सन २०२९च्या राष्ट्रीय निवडणुकीत एएफडी प्रथम क्रमांकावर असेल आणि सेक्सोनी-ऑनाहाल्ट प्रमाणे जर्मनीत एएफडी शिवाय सरकार स्थापन होणार नाही.

**– परिमल माया सुधाकर**

# शिक्षक होण्याची गोष्ट !



आजचा काळ हा अत्यंत सुखसुविधा संपन्न असलेला आहे. जगात कोठेही घडणाऱ्या घडामोडी, माहितीची आदान प्रदान काही क्षणांत होते. माणसाचे आयुष्य हे गतिमान झाले आहे. विविध क्षेत्रात यांत्रिकीकरण जरी झपाट्याने होत असले तरी या तंत्रज्ञानाच्या युगात आजही गुरूंचे महात्म्य, शिक्षकांचे महत्त्व तसूभर देखील कमी झालेले नाही. आणि कमी देखील होणार नाही. प्रत्येक शिक्षकामध्ये एक मातेचे मन दडलेले असते. शिक्षक हा विद्यार्थ्यांना चांगल्या, वाईटाची समज देणारा,अज्ञानाच्या अंधाराकडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा आणि मार्ग दाखविणारा खरा मार्गदर्शक असतो. आपल्या घरानंतर जी वास्तू आपल्याला प्रिय असते ती म्हणजे आपली शाळा.

शाळेत गुरुजी, शिक्षक होण्याचा प्रवास हा काही सोप्पा नसतो. याकरिता अफाट मेहनत, जिद्द, चिकाटी लागते.असेच गुरुजी होण्याचा खराखुरा प्रवास आणि भन्नाट किस्से दिवाळी सुट्टीत गावी गेलो असता प्रत्यक्षात सेवानिवृत्त गुरुजींकडूनच ऐकायला मिळाली. यातून अनेक गोष्टी शिक्षक म्हणून मला शिकण्यास मिळाल्या. मोठी अनुभवाची शिदोरी मिळाली.

यातला गुरुजी होण्याचा प्रवास सांगताना सेवानिवृत्त गुरुजी सांगू लागले की, वर्षभर शेतातली कामे, ऊसाच्या गुऱ्हाळावरील कामे यामुळे अकरावीत इंग्रजी विषयात नापास झालो होतो. पण खचून न जाता वर्षभर जोमाने अभ्यास करून मी चांगल्या गुणांनी इंग्रजी विषयात पास झालो. या आनंदात असतानाही आता अकरावीनंतर पुढे करायचे काय या विचारात होतो. तेव्हा गावातील एक मित्र भेटला. बोलता बोलता मला म्हणाला,अरे तु अकरावी फस्ट क्लास उत्तीर्ण झाला आहेस का रे ? मी अकरावी फस्ट क्लास उत्तीर्ण असल्याने त्याला ' होय ' म्हणालो.

लगेचच मित्र बोलला ,अरे मग तु मास्तर व्हशील लेका! कारण वर्तमानपत्रात शिक्षक भरतीची जाहिरात आली आहे.आणि त्यानुसार तुझी शैक्षणिक पात्रता पण आहे. मग मी जाहिरात वाचून त्यानुसार फॉर्म भरून दिला. मध्यंतरीच्या काळात शेतात काम,गुरे वळणे,घरच्या ऊसाच्या गुऱ्हाळावर कामे, गुऱ्हाळावरील इंजिन दुरुस्ती अशी छोटी मोठी कामे करीत होतो.

काही दिवस गेले. पूर्वी पोस्टातील पत्रे हातोहात दिली जात. गावात पोस्टमनने पत्र आमच्या वाडीतील एका व्यक्तीकडे दिले. त्यांनी ते पत्र आमच्या घरी दिले.आईने रात्री जेवताना पत्र आल्याचे मला सांगितले. मी जेवण झाल्यानंतर चिमणी दिव्याच्या उजेडात ते पत्र पाहिले. ते मुलाखतीचे पत्र होते. पत्र पाहून आनंद झाला. परंतु मुलाखत लगेच दुसऱ्या दिवशी जिल्ह्याची ठिकाणी होणार होती. मुलाखतीसाठी ना कसली तयारी, ना अंगात घालायला चांगली कपडे. आता करायचे काय ? या पेचात पडलो.

पांढरा सदरा,पायजमा आणि डोक्यावर पांढरी टोपी असा माझा पेहराव होता. जो एक कपड्याचा जोड होता; तो पूर्ण मळलेला, त्यावर इंजिन दुरुस्ती करतांना ऑईलचे डाग पडलेले होते. तशीच ती कपडे घेतली व स्वतः हाताने धुतली. कपड्यांना नीळ देऊन सुकायला टाकली. सकाळी लवकर उठून भरभर आवरले पण रात्री धुतलेली कपडे पूर्ण सुकलेले नव्हते. तरीपण पर्याय नसल्याने तसेच काहीसे ओलसरच असलेले कपडे परिधान करून जायला निघालो. सोबत कागदपत्रे घेतली. आईने फडक्यात बांधून चपात्या व चटणी दिली. गावातून पुण्याला जायला गाडी नसल्याने आधी तालुक्याला जाऊन मग तिथून पुण्याला जाणाऱ्या गाडीत बसायला लागायचे. गावातून तालुक्याला जाणारी गाडी त्या दिवशी उशिराने आली. त्यामुळे तालुक्याला जायला उशीर झाला. आता मुलाखतीला वेळेवर पोहचता येणार नाही. आपल्याला उशीर होणार असे वाटल्याने पुण्याला मुलाखतीकरिता पुण्याला जावे की न जावे या विचाराने मनात काहूर माजले. तेवढ्यात पुण्याला जाणारी गाडी आली. बसस्थानकावर गाडी वेळासाठी थांबली. त्यावेळी काही लोक गाडीतून खाली उतरले. त्यात माझ्या वयाची काही तरुण होते. त्यांची उतरताना कुजबुज ऐकली. ते तरुण एकमेकांशी शिक्षक मुलाखतीबद्दल चर्चा करीत असल्याचे कानावर पडले. त्यांच्या बोलण्याने माझ्यात एक उमेद आली. ते युवक सुद्धा मुलाखतीला चालले आहेत. मग आपणही जाऊ. असे मनाशी पुन्हा ठरवले आणि गाडीत बसलो. एव्हाना सकाळी ओलसर असलेली अंगावरील कपडे पूर्णपणे सुकली होती.

पुण्याला जाणारा डांबरी रस्ता हा अरुंद आणि खराब असल्याने मुलाखतीच्या इच्छित स्थळी पोहचण्यास अजूनच उशीर झाला. परंतु मुलाखतस्थळी पोहचताच भरपूर लोक रांगेत असल्याचे दिसले. मी ही रांगेत जाऊन उभा राहिलो. सकाळी घरून गडबडीत निघाल्याने रांगेत उभे राहिल्यानंतर पोटात कावळे ओरडू लागले. आईने बांधून दिलेला डबा सोबत होताच. लागलीच तिथल्या एका कोपऱ्यात बसून जेवण केले. तिथेच असलेल्या नळावर पोटभर पाणी पिऊन परत रांगेत उभा राहिलो. सायंकाळी मुलाखतीला माझा नंबर आला. मुलाखत, कागदपत्रे तपासणीनंतर त्याच दिवशी माझ्या तालुक्यातल्या एका गावातील शाळेवर नियुक्तीचे मला पत्र मिळाले. तद्नंतर दोन, तीन दिवसात त्या शाळेत जाऊन शिक्षक पदावर रुजु झालो. आपल्या अंगी जिद्द, मेहनत,चिकाटी असल्यास आपण नक्कीच यश खेचून आणू शकतो.मी शिक्षक झाल्याने घरातील सगळ्यांना खूप आनंद झाला.

यानंतर काही दिवसांनी शेजारच्या गावातील वडिलांचे मित्र कामानिमित्त घरी आले होते. ते सेवानिवृत्त शिक्षक होते. बोलता बोलता मी गुरुजींना सहजच प्रश्न केला. तुम्ही नोकरीला कधी लागले ?

गुरुजी स्मितहास्य करत म्हणाले, मी १९६७ साली मी नोकरीला लागलो. पण मी गुरुजी होईल असे मी स्वप्नात देखील विचार केलेला नव्हता पण त्याचा एक भारी किस्सा आहे. आणि ते गुरुजी बोलू लागले..

मी चौथीत असताना मला पुढे शाळेत जायची, शिकायची अजिबात इच्छा नव्हती. मला जनावरे चरायला, गुरांच्या मागे गुराखी म्हणून राहायला फार आवडायचे. दिवस दिवस रानात, ओढ्याच्या, नदीच्या कडेने, कुरणात गुरे चारत फिरत असे. घरातील माणसे म्हणायचे अरे बाबा, जनावरांमागे नको जाऊस, शाळेत जा. पण मला शाळेत जायला अजिबात इच्छा होत नव्हती. असेच काही दिवस गेले. एक दिवस सकाळी नदीच्या बाजूच्या कुरणात गुरे चारताना गुरांच्या मागे धावताना पायात काटे टोचले, ओरखाडले, काही तसेच पायात खुडून बसले आणि अक्षरशः पायातून रक्त येत होते. आख्खा दिवस मला पायातले काटे काढण्यात गेला. मला त्यापुढचे काही दिवस धड नीट चालता पण येईना हीच काटे टोचण्याची घटना माझ्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. मग मनाशीच ठरवले गुरे,जनावरे वळणे आता बंद करून शाळा शिकायची आणि मी शाळेत जाऊ लागलो. तद्नंतर मी सातवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले.

आणि एक दिवस गावातले पोस्टमन आमचे घर शोधत शोधत आले. घरच्यांच्या हातात आलेले पत्र देत पोस्टमन वडिलांना म्हणाला, तुमचा मुलगा आता मास्तर होणार' आणि अशा पद्धतीने मी अनपेक्षितपणे शिक्षक झालो.

खरंच शिक्षण हे माणसाच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवते. देशाची भावी युवा पिढी घडविण्याचे महान कार्य शिक्षक करतात. शिक्षक होणे ही सुद्धा एक भाग्याची गोष्ट आहे असे मला वाटते. मला सार्थ अभिमान आहे की मी शिक्षक झालो.

**– रणजित सुदामराव बोत्रे**
**उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षक**
**गोपाळकृष्ण प्राथमिक विद्यामंदिर,**
**गोखलेनगर, पुणे**

# अभिनयाचा सहजसुंदर प्रवास! ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

भारतीय चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाच्या जोरावर स्वतंत्र ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मानांपैकी एक असलेला हा पुरस्कार त्यांच्या पाच दशकांहून अधिक काळाच्या समृद्ध कलाप्रवासाचा गौरव करणारा आहे. कन्नड चित्रपटसृष्टीसह हिंदी आणि अन्य भारतीय भाषांमधील चित्रपटांत आपल्या अभिनयाचा ठसा उमटविणाऱ्या अनंत नाग यांच्या कारकिर्दीचा हा महत्त्वपूर्ण सन्मान आहे. १६ सप्टेंबर २०२६ रोजी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, २२ सप्टेंबर रोजी गुजरातमधील केवडिया येथे होणाऱ्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

चित्रपटसृष्टीत लोकप्रियता मिळविण्यासाठी केवळ देखणे व्यक्तिमत्त्व, संवादफेक किंवा नायकाची प्रतिमा पुरेशी नसते. अभिनयातील सहजता, व्यक्तिरेखेचा सखोल अभ्यास, भावभावनांची अचूक अभिव्यक्ती आणि भूमिकेशी एकरूप होण्याची क्षमता या गुणांच्या बळावर एखादा कलाकार प्रेक्षकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतो. अनंत नाग हे अशाच गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध असलेले अभिनेते आहेत. त्यांनी साकारलेल्या विविध भूमिका केवळ मनोरंजन करणाऱ्या नसून मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडणाऱ्या आहेत. त्यांच्या अभिनयातील नैसर्गिकता आणि संयम ही त्यांची खरी ओळख ठरली आहे.

४ सप्टेंबर १९४८ रोजी जन्मलेल्या अनंत नाग यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात कन्नड चित्रपटातून केली. 'संकल्प' हा त्यांचा पहिला कन्नड चित्रपट, तर 'अंकुर' या हिंदी चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी कन्नड, हिंदी, तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि मराठी अशा विविध भाषांतील चित्रपटांमध्ये काम केले. तीनशेहून अधिक चित्रपटांमधील त्यांचा सहभाग त्यांच्या प्रदीर्घ आणि बहुआयामी कारकिर्दीची साक्ष देतो.

अनंत नाग यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःला एका ठरावीक चौकटीत बंदिस्त होऊ दिले नाही. नायक, सहायक अभिनेता, गंभीर स्वभावाची व्यक्तिरेखा, सामान्य माणसाचे जीवन जगणारा मध्यमवर्गीय किंवा विनोदी भूमिकेतील सहज अभिव्यक्ती अशा विविध स्वरूपांत त्यांनी आपली अभिनयक्षमता सिद्ध केली. त्यांच्या अभिनयात कृत्रिमतेपेक्षा वास्तवाला अधिक महत्त्व असते. पडद्यावर ते एखाद्या व्यक्तिरेखेच्या रूपात समोर येतात, तेव्हा प्रेक्षकांना त्या व्यक्तिरेखेत एक परिचित माणूस दिसतो. हीच त्यांच्या अभिनयाची खरी ताकद आहे.



कन्नड चित्रपटसृष्टीत अनंत नाग यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. व्यावसायिक चित्रपट आणि समांतर चित्रपट अशा दोन्ही प्रवाहांत त्यांनी काम केले. चित्रपट केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजातील वास्तव, मानवी नातेसंबंध आणि जीवनातील संघर्ष व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे, याची जाणीव त्यांच्या अनेक भूमिकांमधून होते. त्यांनी विविध दिग्दर्शकांसोबत काम करताना व्यक्तिरेखांच्या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक आणि भावनिक विषय प्रेक्षकांसमोर मांडले. त्यांच्या अभिनयाने कन्नड चित्रपटसृष्टीतील कलात्मक चित्रपटांच्या परंपरेलाही समृद्ध केले.

'मालगुडी डेज' या लोकप्रिय दूरचित्रवाणी मालिकेतील त्यांचे काम ही विशेष उल्लेखनीय आहे. आर. के. नारायण यांच्या साहित्यविश्वावर आधारित या मालिकेने भारतीय प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. छोट्या शहरातील साधे जीवन, माणसांमधील नातेसंबंध आणि दैनंदिन जगण्यातून उलगडणारे भावविश्व या मालिकेतून प्रेक्षकांसमोर आले. अनंत नाग यांच्या सहज अभिनयामुळे या कथांना अधिक जिवंतपणा प्राप्त झाला. चित्रपटांबरोबरच दूरचित्रवाणीच्या माध्यमातूनही त्यांनी प्रेक्षकांच्या अनेक पिढ्यांशी नाते जोडले.

कलाकाराच्या यशाचे मोजमाप केवळ त्याने मिळविलेल्या पुरस्कारांवरून करता येत नाही. त्याने आपल्या कलेतून किती काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविले, किती विविध भूमिका साकारल्या आणि पुढील पिढीतील कलाकारांना किती प्रेरणा दिली, यालाही महत्त्व असते. अनंत नाग यांच्या कारकिर्दीत या सर्व बाबींचा सुंदर संगम दिसतो. त्यांच्या अभिनयाचा प्रवास हा एका कलाकाराच्या वैयक्तिक यशाचा प्रवास नसून भारतीय चित्रपटसृष्टीतील बदलत्या प्रवाहांचा आणि कलात्मक समृद्धीचा प्रवास आहे.

अनंत नाग यांच्या कलागुणांना यापूर्वीही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांना पाच फिल्मफेअर पुरस्कार, पाच कर्नाटक राज्य सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार आणि कर्नाटक राज्याचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला आहे. २०२५ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. आता दादासाहेब फाळके पुरस्काराच्या रूपाने त्यांच्या प्रदीर्घ कलासाधनेला राष्ट्रीय स्तरावर आणखी एक महत्त्वपूर्ण मान्यता मिळत आहे.

दादासाहेब फाळके पुरस्काराचे महत्त्व केवळ त्याच्या प्रतिष्ठेमध्ये नाही, तर भारतीय चित्रपटसृष्टीच्या उभारणीत आणि विकासात योगदान देणाऱ्या कलाकारांच्या कार्याची दखल घेण्यात आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार चित्रपट क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानाचा गौरव करतो. चित्रपट निर्मितीच्या विविध अंगांमधून भारतीय सिनेमाला समृद्ध करणाऱ्या कलावंतांसाठी हा पुरस्कार प्रेरणादायी मानला जातो.

अनंत नाग यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने कन्नड चित्रपटसृष्टीसाठीही हा अभिमानाचा क्षण आहे. यापूर्वी ज्येष्ठ अभिनेते डॉ. राजकुमार यांना १९९५ मध्ये हा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर हा सन्मान मिळविणारे अनंत नाग हे कन्नड चित्रपटसृष्टीतील दुसरे अभिनेते ठरले आहेत.

आजच्या चित्रपटसृष्टीत तंत्रज्ञान, भव्य निर्मिती, प्रसिद्धी आणि व्यावसायिक गणितांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, या सर्व बदलांमध्ये अभिनयातील प्रामाणिकपणा, व्यक्तिरेखेचा सखोल अभ्यास आणि कलेप्रती असलेली निष्ठा यांचे महत्त्व कायम आहे. अनंत नाग यांची कारकीर्द हेच अधोरेखित करते. लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचण्यासाठी केवळ मोठ्या पडद्यावरील भव्य उपस्थितीची गरज नसते, तर आपल्या कामातून प्रेक्षकांच्या मनात विश्वास निर्माण करावा लागतो. अनंत नाग यांनी आपल्या दीर्घ कारकिर्दीत हा विश्वास संपादन केला आहे.

एकूणच, अनंत नाग यांना जाहीर झालेला दादासाहेब फाळके पुरस्कार हा त्यांच्या प्रदीर्घ कलासाधनेचा, अभिनयातील सहजतेचा आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील अमूल्य योगदानाचा गौरव आहे. त्यांच्या यशातून नवोदित कलाकारांना एक महत्त्वाचा संदेश मिळतोकलेशी प्रामाणिक राहून, सातत्याने मेहनत करून आणि प्रत्येक भूमिकेला न्याय देऊनच कलाकार आपला ठसा काळाच्या पटलावर उमटवू शकतो. अनंत नाग यांचा प्रवास हा अशाच समर्पित कलासाधनेचा प्रेरणादायी आदर्श आहे. त्यांच्या या सन्मानामुळे भारतीय चित्रपटसृष्टीतील एका ज्येष्ठ आणि प्रतिभावान कलाकाराच्या कार्याचा गौरव झाला आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# रमाई प्रेरणा संग्रहालय सृष्टीचे भूमिपूजन उत्साहात



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पुणे :** मातोश्री रमाबाई आंबेडकर पुतळा स्मारक समितीच्या जागेवर पुणे रेल्वे स्टेशन परिसरातील सोहराब हॉल चौकात उभारण्यात येणाऱ्या 'त्यागमूर्ती रमाई प्रेरणा संग्रहालय सृष्टी' चे भूमिपूजन शनिवारी (दि.१९) दुपारी १२.३० वाजता उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्मारक समितीचे अध्यक्ष प्रकाश साळवे होते. प्रभाग क्रमांक १३ चे नगरसेवक निलेश भाऊ आल्हाट यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

रमाबाई आंबेडकर यांच्या त्याग, संघर्ष आणि सामाजिक योगदानाची माहिती पुढील पिढीतील युवक-युवतींपर्यंत पोहोचावी, त्यांच्या जीवनकार्यापासून प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हे संग्रहालय उभारण्यात येत आहे. या ठिकाणी युवक-युवतींसाठी अभ्यासिका तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्राची निर्मिती करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला. रमाईंनी सावलीप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना साथ देत त्यांच्या जीवनप्रवासात मोलाचे योगदान दिले. रमाईंच्या त्यागातून पुढील पिढीला प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष सोनू भाऊ निकाळजे होते. नियोजन व संकल्पना स्मारक समितीचे सरचिटणीस राहुल दादा तायडे यांनी केली. सूत्रसंचालन दत्ता गायकवाड यांनी केले, तर गौतम सवाने यांनी आभार मानले.

यावेळी के. बी. मोटघरे, आर. जे. वंजारे, स्वीकृत नगरसेवक जयप्रकाश पुरोहित, ज्ञानेश्वर कोठावळे, सतीश नाना बनसोडे, उत्तम बनसोडे, अरुण गायकवाड, हिरामण सूर्यवंशी, दीपक शिंदे, सुनील डाळिंबे, सुजित आप्पा यादव, बंडू सर गायकवाड, बौद्धाचार्य संजय शिंदे, अविनाश मोरे, प्रभाकर सोनकांबळे, प्रीतम भोसले, सोहन परदेशी, सुनील भोईटे, दिनकर चिकाटे, उत्तम जगताप, विक्रम कांबळे, रवींद्र फणसे, प्रेमानंद उबाळे, प्रेम जोगदंड, आदिनाथ गायकवाड तसेच जय महाराष्ट्र रिक्षा स्टॅन्डचे पदाधिकारी व सभासद, विविध संस्था, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि विविध पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# राजा शिवछत्रपती युवा मंचाच्या वतीने मोफत डोळे तपासणी शिबीर




**अक्षराज : विठ्ठल निकाळजे**

**दि.१९, चिंचवड (पुणे) :** गणेशोत्सवाचे औचित्य साधून वाल्हेकरवाडी, चिंचवड येथील शिवले इस्टेट, शिवाजी पार्क येथे 'राजा शिवछत्रपती युवा मंच' यांच्या वतीने आज (१९ सप्टेंबर) मोफत डोळे तपासणी शिबिराचे अत्यंत यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमास परिसरातील नागरिकांकडून उदंड प्रतिसाद मिळाला.

या शिबिरामध्ये 'ईशा नेत्रालया'च्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने सहभागी होऊन नागरिकांची मोफत नेत्रतपासणी केली व त्यांना योग्य ते वैद्यकीय मार्गदर्शन केले. दिवसभरात १०० पेक्षा जास्त नागरिकांनी या शिबिराचा प्रत्यक्ष लाभ घेतला आणि आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेतली.

या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन राजा शिवछत्रपती युवा मंचाचे अध्यक्ष वाल्मिक शिवले तसेच मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी मिळून केले होते. गणेशोत्सवाच्या काळात केवळ उत्सव न साजरा करता अशा प्रकारचा आरोग्यविषयक आणि सामाजिक उपक्रम राबवल्याबद्दल शिवाजी पार्क व शिवले इस्टेट परिसरातील नागरिकांनी राजा शिवछत्रपती युवा मंचाचे विशेष आभार मानले व कौतुक केले.

# अभिषेक वाघ यांना इतिहास विषयात पी.एच.डी. पदवी प्रदान




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने अभिषेक आनंदराव वाघ यांना इतिहास विषयात आचार्य (पीएच.डी.) ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी नुकतीच प्रदान केली आहे.

त्यांनी प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील प्रौढ शिक्षण चळवळीचा ऐतिहासिक अभ्यास (१९४७ ते १९९०) या महत्त्वपूर्ण विषयावर आपले संशोधन पूर्ण केले.

विशेष म्हणजे, अभिषेक वाघ यांच्या या संशोधनासाठी भारतीय इतिहास अनुसंधान परिषद (ICHR), नवी दिल्ली यांच्याकडून अत्यंत प्रतिष्ठेची 'कनिष्ठ शोध छात्रवृत्ती' (JRF - Junior Research Fellowship) मंजूर झाली होती. या फेलोशिपच्या माध्यमातून त्यांनी आपले सखोल संशोधन कार्य यशस्वीरीत्या पूर्ण केले.

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील प्रौढ शिक्षणाची चळवळ आणि त्याचा सामाजिक परिणाम यावर त्यांनी मांडलेला ऐतिहासिक दृष्टिकोन अभ्यासकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, प्राध्यापक, सहकारी, मित्रपरिवार आणि विद्यार्थ्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'गणपती बाप्पा मोरया'च्या गजरात पाच दिवसीय ६१५४ श्री गणेशमूर्तींचे सुव्यवस्थित विसर्जन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'पर्यावरणशील प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव २०२६' साजरा करण्याबाबत नवी मुंबईकरांना करण्यात आलेल्या आवाहनास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद लाभला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ६ फूटापर्यंतच्या सर्व श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन पर्यावरण जपणुकीकरिता कृत्रिम तलावातच करावे या आवाहनासही नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. महानगरपालिकेने ठिकठिकाणी १५६ इतक्या मोठ्या संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांमध्ये नागरिकांनी श्रीमूर्ती विसर्जनाला प्राधान्य दिले.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पाचव्या विसर्जन दिवशी २२ नैसर्गिक विसर्जन स्थळे व ११ (१४ गावे) नैसर्गिक विसर्जन स्थळे तसेच १५६ कृत्रिम विसर्जन स्थळे अशा एकूण १८९ विसर्जन स्थळांवर एकूण ६१५४ श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन सुव्यवस्थित रितीने संपन्न झाले.

यामध्ये बेलापूर विभागात ५ नैसर्गिक व २१ कृत्रिम विसर्जन स्थळांवर १०८४ घरगुती व २५ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. नेरुळ विभागात २ नैसर्गिक व २४ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ७३१ घरगुती व ५ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन संपन्नझाले.

वाशी विभागात २ नैसर्गिक व १६ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ५९३ घरगुती व १० सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

तुर्भे विभागात ३ नैसर्गिक व २१ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ६५८ घरगुती तसेच ०७ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन झाले.

कोपरखैरणे विभागात २ नैसर्गिक व १६ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ९९१ घरगुती श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन संपन्न झाले.

घणसोली विभागात ४ नैसर्गिक व १५ कृत्रिम विसर्जन स्थळांवर १००५ घरगुती व ०१ सार्वजनिक मंडळांच्या श्रीगणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

ऐरोली विभागात ३ नैसर्गिक व १८ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ७८७ घरगुती व ३ सार्वजनिक मंडळाच्या श्रीगणेशमूर्तीचे विसर्जन संपन्न झाले.



दिघा विभागात १ नैसर्गिक व १० कृत्रिम विसर्जन स्थळांवर २४८ घरगुती व ५ सार्वजनिक श्रीमूर्तींचे विसर्जन संपन्न झाले. दिघा विभागांतर्गत १४ गावांमध्ये घरगुती ०१ गणेशमूर्तीचे विसर्जन संपन्न झाले.

अशाप्रकारे संपूर्ण नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १८९ विसर्जन स्थळांवर पाच दिवसीय ६१५४ श्रीगणेशमूर्तींना भक्तीपूर्ण निरोप देण्यात आला. यामध्ये शाडू मातीच्या १४४४ श्रीमूर्तींचे पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत भावपूर्ण विसर्जन करण्यात आले. शाडू मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करुन पर्यावरणशील दृष्टीकोन जपणा-या नागरिकांना 'पर्यावरण मित्र' म्हणून महापौर श्रीम.सुजाता पाटील व प्रमुख पदाधिकारी आणि आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र आणि 'प्लास्टिक पिशव्यांना नकार व कागदी पिशवीचा स्विकार' असा संदेश प्रसारित करणा-या आकर्षक कागदी पिशव्या प्रदान करुन सर्व विसर्जन स्थळांवर सन्मानित करण्यात आले.

आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे यांच्यासह परिमंडळ १ उपआयुक्त डॉ.अमोल पालवे व परिमंडळ २ उपआयुक्त संजय शिंदे यांच्या नियंत्रणाखाली आठही विभाग कार्यालयांमार्फत संबधित विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी तसेच शहर अभियंता शिरीष आरदवाड आणि सर्व कार्यकारी अभियंता व त्यांचे सहकारी तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून श्रीमूर्ती विसर्जनासाठी संबधित अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवक विसर्जन स्थळांवर तत्परतेने कार्यरत होते. विसर्जनासाठी महानगरपालिकेने केलेल्या कृत्रिम तलावांच्या व्यवस्थेसह विसर्जन स्थळावरील सुविधांबाबत नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

२२ नैसर्गिक विसर्जन स्थळांवर ६ फूटापेक्षा मोठया आकाराच्या श्रीमूर्ती विसर्जनासाठी तराफ्यांची व्यवस्था तसेच अनुभवी स्वयंसेवकांची व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थित भाविकांना महत्वाच्या सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपकासह व्यासपीठ व्यवस्था करण्यात आलेली होती.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार ६ फूटापेक्षा कमी उंचीच्या श्रीमूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन करावे असे आवाहन नागरिकांना सातत्याने करण्यात येत होते. कृत्रिम तलावात विसर्जन करण्याचे महत्व नागरिकांना पटवून दिले जात होते. त्यास अनुसरुन नागरिकांनी व मंडळांनी आपल्या ६ फूटापेक्षा कमी उंचीच्या श्रीमूर्ती कृत्रिम विसर्जन स्थळावरच विसर्जन करण्यास प्राधान्य दिले.

सर्व ठिकाणी पुरेशा प्रमाणात विद्युत व्यवस्था आणि जनरेटर व्यवस्था ठेवण्यात आली होती. नागरी आरोग्य केंद्रामार्फत त्याठिकाणी वैद्यकीय पथके तैनात होती. संबंधित विभाग कार्यालयांच्या माध्यमातून स्वयंसेवक, लाईफगार्ड्स व्यवस्थाही कार्यरत होती.

सर्व विसर्जन स्थळांवर ओले व सुके निर्माल्य ठेवण्यासाठी स्वतंत्र कलशांची व्यवस्था करण्यात आली होती तसेच ते स्वतंत्रपणे वाहून नेण्यासाठी वाहन व्यवस्थाही करण्यात आली होती. भाविकांनी निर्माल्य जलाशयात न टाकता ते निर्माल्य कलशात ठेवावे असे आवाहन सातत्याने करण्यात येत होते. संकलित निर्माल्य तुर्भे येथील प्रकल्प स्थळी नेण्यात येऊन त्याचे पावित्र्य राखत सुयोग्य विल्हेवाट लावली जात आहे. नवी मुंबई पोलीस विभाग आणि वाहतुक पोलीस विभागानेही कायदा, सुव्यवस्था व वाहतूक नियोजनाचे काम दक्षतेने व तत्परतेने केले.

नवी मुंबईकर नागरिकांनी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा मान राखून ६ फूटापर्यंतच्या श्रीमूर्तींचे विसर्जन महानगरपालिकेने मोठया संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन स्थळावर करण्यास प्राधान्य दिले असून आपला पर्यावरणशील दृष्टीकोन प्रदर्शित केला आहे त्याबद्दल नागरिकांचे आभार व्यक्त करीत गणपतीसह गौरी विसर्जन दिनीही नागरिकांनी कृत्रिम विसर्जन तलावांचाच वापर करुन संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आलेले आहे.

# बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीत 'रक्तदानातून जीवनदान'; युवासेनेचा समाजसेवेचा संकल्प

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१९, सोलापूर :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे युवासेना सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि.२० सप्टेंबर २०२६ रोजी सात रस्ता येथील उपलप मंगल कार्यालयात हे शिबिर होणार असल्याची माहिती युवासेनेचे सोलापूर शहरप्रमुख तुषार आवताडे यांनी दिली.

बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात समाजाशी असलेले नाते आणि सामाजिक बांधिलकीला महत्त्व दिले. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे



औचित्य साधून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प युवासेनेच्या वतीने करण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रक्तदान हे गरजू रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणारे सामाजिक कार्य आहे. अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, गर्भवती महिला तसेच विविध आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांना वेळोवेळी रक्ताची आवश्यकता भासते. अशा गरजू रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'बाळासाहेबांच्या विचारांना अभिवादन, रक्तदानातून समाजसेवेचा संकल्प' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात युवक, नागरिक, शिवसैनिक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी युवासेना सोलापूर शहर व जिल्ह्याचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवसैनिकांकडून नियोजन करण्यात येत आहे. रक्तदानासारख्या समाजोपयोगी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळावा, यासाठी जनजागृती करण्यात येत आहे.

सोलापूर जिल्हाप्रमुख राम वाकसे, जिल्हाप्रमुख रमेश चौगुले आणि युवासेना शहरप्रमुख तुषार आवताडे यांनी युवकांसह नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन केले आहे.

# जागतिक बांबू दिवसानिमित्त नवी मुंबईत १२०० हून अधिक बांबू वृक्षलागवड



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, नवी मुंबई :** सेवा संकल्प अभियानातील 'सेवा माझे योगदान' या उपक्रमांतर्गत जागतिक बांबू दिवसाचे औचित्य साधून माझी वसुंधरा अभियान ७.० मध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी बांबू वृक्ष लागवड कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या वृक्षलागवडीत लोकप्रतिनिधींसह पर्यावरणप्रेमी नागरिकही उत्साहाने सहभागी झाले.

बांबू हा जलद वाढणारा आणि पर्यावरणाला भरपूर प्राणवायू देणारा वृक्ष असल्याने नवी मुंबईतील हरित क्षेत्राचा पर्यावरणपूरक विकास होण्याच्या दृष्टीने ही विशेष मोहीम राबविण्यात आली. पर्यावरण संवर्धन आणि कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्राधान्याने देशी वृक्षलागवड करण्याचे महापालिकेने निश्चित केले असून त्यास अनुसरून विविध ठिकाणी वृक्षारोपण मोहीमा मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून जागतिक बांबू दिवसाचे औचित्य साधून १८ सप्टेंबर रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकस्पनेतील 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत बांबू वृक्ष लागवडीची मोठी मोहीम हाती घेण्यात आली.

उद्यान विभागाच्या उपआयुक्त स्मिता काळे यांच्या नियंत्रणाखाली ८ विभागात राबविण्यात आलेल्या या वृक्षारोपण मोहीमांमध्ये विद्यार्थी, नागरिक तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी यांच्यासह पाणीपुरवठा समिती सभापती रविकांत पाटील, नगरसेविका ॲड.भारती पाटील, नगरसेवक डी.आर. पाटील, नगरसेविका दिक्षा कचरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वच ठिकाणी संबंधित कार्यालयाचे विभाग अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता उपस्थित होते. विशेषत्वाने संत निरंकारी संस्था कोपरखैरणे या सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी व सदस्यही या मोहीमेत सहभागी झाले होते.

**यावेळी –**

बेलापूर : सेक्टर ८ डॅम परिसर – २५ बांबू झाडे
नेरुळ : सायकल ट्रॅक, सेक्टर १९ – २५ बांबू झाडे
सानपाडा : ट्री बेल्ट, सेक्टर ३० – ३५ बांबू झाडे
वाशी : एपीजे अब्दुल कलाम उद्यान, सेक्टर १० – २२ बांबू झाडे
कोपरखैरणे : शांतिदूत महावीर उद्यान, सेक्टर २३ – ३८० बांबू झाडे
घणसोली : भूखंड क्रमांक २७, सेक्टर १५ – २५ बांबू झाडे
ऐरोली : स्मशानभूमी परिसर, सेक्टर २० – ६० बांबू झाड
दिघा : बालमित्र साने गुरुजी उद्यान – १५ बांबू झाडे

अशा आठ विभागांतील मुख्य ठिकाणी तसेच इतर विविध ठिकाणी मिळून एकूण १२०० हून अधिक बांबू वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. यामध्ये लोकप्रतिनिधींनी नागरिकांसह सहभागी होत वृक्षारोपणातून पर्यावरण रक्षणाचा संदेश प्रसारित केला. सेवा संकल्प अभियानामध्ये महापौर सुजाता पाटील व आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये उद्यान विभागामार्फत अशा प्रकारचे वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या संख्येने हाती घेण्यात येत आहेत.

# चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शिवार फेरीचा लाभ घ्यावा !

## अकोल्यात शेतीचे तंत्रज्ञान थेट शिवारात; २५ एकरांवर २२८ पीक तंत्रज्ञानांची पर्वणी

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१९, चिमूर (चंद्रपूर) :** आधुनिक शेतीतील नवे तंत्रज्ञान, सुधारित पीक पद्धती आणि शाश्वत शेतीचे प्रयोग शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शिवारात पाहता यावेत, यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला व कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय भव्य कृषी तंत्रज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. २० ते २२ सप्टेंबर २०२६ दरम्यान होणाऱ्या या मेळाव्यात शिवारफेरी, थेट पीक प्रात्यक्षिके आणि चर्चासत्रांच्या माध्यमातून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

मेळाव्याचे उद्घाटन रविवार, २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील थेट पीक प्रात्यक्षिक क्षेत्रात होणार आहे. या मेळाव्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे २५ एकर क्षेत्रावर उभारण्यात आलेली २२८ खरीप पीक उत्पादन तंत्रज्ञानांची थेट प्रात्यक्षिके. तृणधान्ये, कडधान्ये, कापूस, सोयाबीन, फळपिके, फुलपिके, चारापिके, धानपिके यांसह विविध पिकांमधील आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहता येणार आहे.

यासोबतच १६ खाजगी कृषी निविष्ठा कंपन्यांची थेट प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली असून, विद्यापीठाच्या विविध संशोधन विभागांचे तब्बल ३२०० हेक्टर क्षेत्र शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे. पीक उत्पादन वाढीसोबतच कमी खर्चातील, शाश्वत व पर्यावरणपूरक शेती पद्धतींबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शनही या उपक्रमातून उपलब्ध होणार आहे.

शिवारफेरीमध्ये होणारी गर्दी नियंत्रित करण्यासाठी जिल्हानिहाय दिवस निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी




मंगळवार,२२ सप्टेंबर हा विशेष दिवस राखीव ठेवण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या दिवशी शिवारफेरीला भेट देऊन आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तथापि, शेतकरी आपल्या सोयीनुसार २० ते २२ सप्टेंबरदरम्यान कोणत्याही दिवशी शिवारफेरीला भेट देऊ शकतात.

शेतकरी, संशोधक, धोरणकर्ते आणि कृषी उद्योगातील भागधारक यांच्यात ज्ञानाची देवाणघेवाण घडवून आणणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश आहे. या कृषी तंत्रज्ञान मेळाव्याचा जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सोनाली लोखंडे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही आणि डॉ. विजय सिडाम, कृषी विद्यावेत्ता, कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी केले आहे.

# पेण तालुक्यासह ग्रामीण भागात गौरीसोबत ५ दिवसांच्या बाप्पाला भक्तिमय वातावरणात निरोप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पेण :** पेण तालुक्यासह ग्रामीण भागात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असतानाच शनिवारी पाच दिवसांच्या गणरायाला तसेच गौरीसोबत बाप्पाला भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद, फुलांची सजावट आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

सोमवारी दि. १४ रोजी मोठ्या उत्साहात गणरायाचे घरोघरी आगमन झाले होते. गणेशमूर्तींची विधिवत स्थापना करून पाच दिवस भक्तिभावाने पूजा-अर्चा, आरती, भजन आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले. शुक्रवारी पाचव्या दिवशी सायंकाळी गणरायाची विधिवत पूजा व आरती करून गणेशभक्तांनी बाप्पाला निरोप देण्याची तयारी केली.



गौरी-गणपतीचा सण असल्याने अनेक घरांमध्ये गौरीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. त्यामुळे गौरीसोबत पाच दिवसांच्या गणरायाचे विसर्जन करण्यासाठी महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. घरातील सदस्यांनी बाप्पाची आरती करून प्रसादाचे वाटप केले. त्यानंतर गणेशमूर्तींची फुलांनी सजावट करून वाजत-गाजत छोटी मिरवणूक काढण्यात आली.'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या', 'एक, दोन, तीन, चार... गणपतीचा जयजयकार', 'गणपती गेले गावाला, चैन पडेना जीवाला' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. तरुणाईने ढोल-ताशांच्या तालावर उत्साहात सहभाग घेतला. काही ठिकाणी भजन, आरती आणि पारंपरिक वाद्यांच्या साथीने गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. कुटुंबीयांसह गणेशभक्तांनी विधिवत पूजा करून 'पुढच्या वर्षी लवकर या' अशी प्रार्थना करत बाप्पाच्या मूर्तींचे विसर्जन केले. काही ठिकाणी तरुणांनी नदीपात्रात उतरून भक्तिभावाने गणरायाला अखेरचा निरोप दिला.

दरम्यान, गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करण्यास प्राधान्य दिल्याचेही दिसून आले. गणेशोत्सवाच्या पाच दिवसांत निर्माण झालेला भक्तिमय माहोल विसर्जनाच्या वेळी भावनिक झाला. बाप्पाला निरोप देताना अनेक गणेशभक्तांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

पाच दिवसांच्या गणरायाच्या विसर्जनामुळे पेण तालुक्यातील विविध गावांमध्ये गणेशोत्सवाच्या उत्साहाला भावनिक व भक्तिमय विराम मिळाला.

# माधवराव पाटील महाविद्यालयात नव मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिर संपन्न

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१९, पालम (परभणी) :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत दावे व हरकतीच्या कालावधीत नवमतदारांची नोंदणी व्हावी, यासाठी पालम येथील माधवराव पाटील महाविद्यालयात आज विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी, ९७-गंगाखेड विधानसभा मतदारसंघ जीवराज डपकर साहेब आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र युवक-युवतींची तसेच प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या पात्र नागरिकांची नोंदणी करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी नायब तहसीलदार (निवडणूक), पालम विनोद पवार यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीची संपूर्ण प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज पद्धतीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आत्माराम आरसुळे यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देत, लोकशाहीत




प्रत्येक मताची किंमत अनमोल असल्याचे सांगितले. बळीराजा शिक्षण संस्थेचे संचालक प्रा. डॉ. शिवाजीराव पौळ यांनी विद्यार्थ्यांना नागरिकांचे हक्क, कर्तव्ये आणि अधिकार याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. बी. एस. पवार यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. एन. एस. जाधव यांनी मानले.

या विशेष शिबिरादरम्यान २२ पात्र नवमतदारांकडून नमुना फॉर्म क्र. ६ भरून घेण्यात आला. या शिबिराला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# घुग्घूसच्या विकासाला नवी गती, ग्रामीण रुग्णालयामुळे आरोग्य सेवेला बळ - किशोर जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** घुग्घूसच्या नागरिकांना आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. ग्रामीण रुग्णालय सुरू झाल्यामुळे आता येथील नागरिकांना उपचारासाठी वारंवार चंद्रपूरला जाण्याची गरज भासणार नाही. ५० हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या घुग्घूसचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी सातत्याने प्रयत्न केले असून नगर परिषद, उड्डाणपूल आणि आता ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून शहराच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे, असे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले. सेवा संकल्प अभियाना अंतर्गत घुग्घूस येथील ग्रामीण रुग्णालयाचे लोकार्पण पालकमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी पालकमंत्री डॉ. प्रा. अशोक उईके, आ. देवराव भोंगळे, आ. करण देवतळे, यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण रुग्णालय सुरू झाल्याने घुग्घूस आणि परिसरातील नागरिकांना स्थानिक पातळीवर आरोग्य सुविधा उपलब्ध होणार




आहेत. त्यामुळे उपचारासाठी चंद्रपूर शहराचा प्रवास करण्याचा त्रास नागरिकांना मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. यावेळी बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, घुग्घूस येथे ग्रामीण रुग्णालय सुरू व्हावे यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला होता. वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या आरोग्याच्या गरजा लक्षात घेता येथे सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध होणे आवश्यक होते. आता ग्रामीण रुग्णालय प्रत्यक्ष सेवेत दाखल झाल्यामुळे घुग्घूससह परिसरातील नागरिकांना त्याचा मोठा लाभ मिळणार आहे. विशेषतः तातडीच्या उपचारांसाठी नागरिकांना चंद्रपूरला जाण्याची आवश्यकता कमी होणार असून स्थानिक पातळीवरच आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे. घुग्घूसच्या सर्वांगीण विकासाचा उल्लेख करताना आ. जोरगेवार म्हणाले की, अनेक वर्षांपासून घुग्घूसचा कारभार ग्रामपंचायतीच्या माध्यमातून चालत होता. मात्र ५० हजारांहून अधिक लोकसंख्या असतानाही शहराला नगर परिषदेचा दर्जा नव्हता. घुग्घूसच्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा आणि भविष्यातील विकास लक्षात घेऊन येथे नगर परिषद स्थापन व्हावी यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केले. या प्रयत्नांना यश मिळून घुग्घूस नगर परिषदेची स्थापना झाली. त्यामुळे शहरातील नागरी सुविधा आणि विकासकामांना अधिक व्यापक स्वरूप मिळाले आहे.

घुग्घूसमधील उड्डाणपूल आणि आता ग्रामीण रुग्णालय हे शहराच्या विकासाच्या दिशेने पडलेले महत्त्वाचे टप्पे आहेत. नागरिकांना चांगल्या पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देत घुग्घूसला अधिक विकसित शहर म्हणून पुढे नेण्यासाठी आपले प्रयत्न सुरूच राहतील. विकासाची ही गती कायम ठेवत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात बातम्या

### 'सावली स्कूल ऑफ नर्सिंग'चा निकाल १०० टक्के शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील सावली स्कूल ऑफ नर्सिंगने शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत छचआॅ द्वितीय वर्षाच्या नर्सिंग परीक्षेत १०० टक्के निकाल मिळविला आहे. परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थिनी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्याने संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या परीक्षेत रजिया रजाक शेख हिने ८८.८३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. मंगल ज्ञानेश्वर दाभाडे हिने ७८.८३ टक्के गुणांसह द्वितीय, तर साक्षी गेणूभाऊ भोसले हिने ७८.५० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशाचे परिसरातून कौतुक होत आहे.

विद्यार्थिनींच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक डॉ. भाऊसाहेब खिलारी, डॉ. स्वाती खिलारी तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उत्तीर्ण व गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. या यशासाठी प्राचार्य शीतल गरकल यांच्या मार्गदर्शनासह प्रा. नामदेव वाळुंज, प्रा. पिंकी त्रिभुवन व प्रा. पुष्पा धुले यांनी घेतलेल्या परिश्रमाचेही विशेष कौतुक करण्यात आले.

### पारनेरच्या कला शिक्षकाने साकारली भारताच्या नकाशाची भव्य रांगोळी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, अहिल्यानगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या प्रांगणात देश भक्तीचा आगळा वेगळा आविष्कार पाहायला मिळाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी




यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील गावपातळीपर्यंत शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती करण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत गुरूवारी जिल्हा परिषद मुख्यालयाच्या आवारात पारनेर तालुक्यातील वासुंदे येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष पांडुरंग क्षीरसागर यांनी भारताच्या नकाशाची भव्य व आकर्षक रांगोळी साकारत देशभक्तीचा आणि सेवा संकल्पाचा संदेश दिला. विविध रंगांनी साकारलेल्या या रांगोळीतून केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती आणि त्यांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला. सेवा संकल्प अभियान केवळ जिल्हा परिषद मुख्यालयापुरते मर्यादित न ठेवता गावपातळीपर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून पोहोचविण्यात येत आहे.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनी सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

- **मानवी साखळीतून साकारला भारत**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या मदतीने मानवी साखळी करून प्रथम भारताचा नकाशा तयार करण्यात आला. आणि त्यावर विविध रंगांच्या सुमारे ५० किलो रांगोळीचा वापर करून काही तासांत ही कलाकृती पूर्ण करण्यात आली. रांगोळी पाहण्यासाठी कर्मचाऱ्यांसह नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

- या कलाकृतीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके शिक्षणाअधिकारी भास्कर पाटील यांनी कला शिक्षक संतोष क्षीरसागर यांचा सत्कार केला. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनीही त्यांचे विशेष कौतुक केले.
- फळ्यावर, भिंतीवर भारताचा नकाशा अनेकदा काढला, पण एवढ्या मोठ्या मैदानावर जमिनीवर रांगोळी साकारण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. कलेतून देशसेवेचा संदेश देता आला याचा आनंद आहे. रांगोळी रेखाटन बघून कलाक्षेत्रातील अनेकांच्या प्रेरणादायी प्रतिक्रिया येत आहेत.

**– कलाशिक्षक संतोष क्षीरसागर, न्यू इंग्लिश स्कूल वसुंदे**

### खापरखेडा वीज केन्द्रातील नारोबा-बारोबा मंदिरात भक्तिभावाने महापूजा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** खापरखेडा येथील ५०० मेगावॅट वीज केन्द्राच्या सीएचपी-२ परिसरातील नारोबा-बारोबा मंदिरात पारंपारिक धार्मिक वातावरणात भक्तिभावाने



महापूजा व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ऋषी पंचमीचे औचित्य साधुन वीज केंद्रातून अखंड व सुरक्षित वीज निर्मिती सुरू राहावी, कार्यस्थळी कोणतीही दुर्घटना घडू नये तसेच वीज घरात कार्यरत अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कामगारांचे आरोग्य उत्तम राहावे, यासाठी या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी विधिवत पूजा-अर्चनेने झाली. मंदिर परिसरात सकाळपासूनच अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगार तसेच भाविकांची गर्दी झाली होती. ५०० मेगावॅट वीज केन्द्र सीएचपी-२ चे अधीक्षक अभियंता भट व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते नारोबा-बारोबा यांची विधिवत पूजा-अर्चना व महाआरती करण्यात आली. यावेळी वीज केंद्राची सुख-समृद्धी, सुरक्षित संचालन तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कामगारांच्या आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली.महापूजेनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटी कामगारांनी एकत्रितपणे महाप्रसादाचा लाभ घेतला. यामुळे मंदिर परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.या कार्यक्रमाला वीज केंद्राचे मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे, उपमुख्य अभियंता किशोर सूर्यवंशी, फुटाणे साहेब, येवले साहेब, शिंदे साहेब, बोंडे साहेब, जाधव साहेब, डडमल साहेब, समाधान साहेब, निचड साहेब, गणेश लांडे साहेब यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच सीएचपी-२ अंतर्गत कार्यरत मोठ्या संख्येने कंत्राटी कामगारांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला.नारोबा-बारोबा मंदिरात आयोजित या धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून वीज केंद्राचे सुरक्षित व सुरळीत संचालन, अधिकारी-कर्मचारी आणि कंत्राटी कामगारांचे आरोग्य तसेच सर्वांमध्ये परस्पर सद्भावना आणि एकजुटीची भावना वृद्धिंगत व्हावी, असा संदेश देण्यात आला. महाप्रसादानंतर कार्यक्रमाचा भक्तिमय वातावरणात समारोप झाला.